भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2021 ◑ YZ 887009

अनुक्रमांक ८७९२ दिनांक २१/२१/२१ रुपये १००/-

मुद्रांक कोणत्या कारणासाठी वापरावयाचा आहे ......

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे अनुच्छेद क्रं. ३२/२.

मुद्रांक वापरणाराचे संपूर्ण नांव योगेश भारत सावंत.

संपूर्ण पत्ता बारामती.

हस्ते व्यक्तीचे संपूर्ण नांव ......

पत्ता ८३८

मुद्रांक धारकाची/हस्ते व्यक्तीची सही

H. G. Bhosale
स्वाक्षरी
हेमलता गणपत भोसले,
मुद्रांक विक्रेता, परवाना क्रमांक - २२०३०१४

उप कोषागार कार्यालय बारामती
23 NOV 2021
उपकोषागार अधिकारी
बारामती

## क रा र ना मा

### विद्यार्थिनी वसतीगृह मेस चालविण्याचा परवानगीचा करार

मा.श्री.मिलिंद राजकुमार शाह,
सचिव, अनेकान्त एज्युकेशन सोसायटी,
बारामती, जि.पुणे

करार लिहून घेणार

श्री. योगेश भारत सावंत
ओम श्री रूद्र सिध्दी केटरर्स
मु.पो. बारामती ता.बारामती,जि.पुणे

करार लिहून देणार

कारणे करारनामा लिहून देतो की, बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या आवारातील अनेकान्त एज्युकेशन संस्थेच्या वसतीगृहातील मेस विद्यार्थीनींच्या सोयीसाठी चालविण्याकरिता मी मागणी केल्यावरुन खालील अटींवर आपण मला ती देत आहात. त्याच्या अटी पुढीलप्रमाणे आहेत व त्या मला मान्य आहेत.

१. सदर मेस दि.२४/११/२०२१ ते ३१/०५/२०२२ अखेर (म्हणजेच ६ महिने ७ दिवस चालविण्यांस दिलेली आहे.

२. सदर मुदतीकरिता जागा भाडे दरमहा रु. १५०००/—(रुपये पंधरा हजार फक्त) प्रमाणे सहा महिन्यांचे भाडे एकूण रु. ९००००/— (रूपये नव्वद हजार फक्त) माझा व्यवसाय सुरु करण्यापूर्वी भरण्याचे मला मान्य आहे. तसेच प्रत्यक्ष येणारे लाईट बीलाच्या रक्कमेचा संस्थेकडे दरमहा. विजमंडळाने दिलेल्या मुदत्तीत भरणा करेन. तसेच पाणी पुरवठया बद्दल दरमहा रूपये १००प्रमाणे संस्थेकडे जमा करेन.

३. मेस चालू करण्यापूर्वी मी व्यवसाय नोंदणी, नगरपालिका व प्रांत ऑफिसकडून नियमाप्रमाणे रितसर परवानगी घेण्याची जबाबदारी माझी राहील व ती मी पार पाडीन.

४. स्वयंपाकास लागणारी सर्व प्रकारची भांडी व उपकरणे मी स्वत:ची वापरेन.

५. मेस चालवितांना विद्यार्थीनीकडून मेस शुल्क वसुल करण्याची, आर्थिक देणे घेणे संबंधीत सर्वजबाबदारी माझी/माझेवरच राहील.

६. मेसमध्ये व इतरत्र माझ्यासाठी काम करणारे सर्व कर्मचारी निरोगी व निर्व्यसनी असतील.मी कोणताही बाल कामगार कामावर ठेवणार नाही. तसेच मेसमधील कामगारांना आकाशी निळया रंगाचा ॲप्रन व पायामध्ये एकाच रंगाच्या सपाता स्लीपर्स मी स्वखर्चाने देईन. त्याचप्रमाणे मेस मधील कामगारांची नांवे, पत्ते, फोटो इ. माहिती मी आपल्या कार्यालयात जमा करीन. तसेच वसतिगृह समितीने ठरविल्याप्रमाणे मी माझ्या मेस मधील सर्व कर्मचाऱ्याना माझ्या केटरिंगचे नांव असलेला सर्वासाठी एक पोशाख देईल त्याबदल मला कोणतीही अडचण नाही.

७. मेस रुम, स्वयंपाकघर व माझ्या वापरातील आजूबाजूचा परिसर हा सतत स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी मी घेईन. व ते काम माझ्या कामगारांकडून प्रतिदिनी करुन घेईन.

८. मेस मधील कामगारांचे आवश्यक ते मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट दर तीन महिन्याला घेईन व ते रितसर आपणांकडे सादर करेन.

९. विद्यार्थीनींच्या चहा, नाश्ता व जेवणाच्या वेळा खालीलप्रमाणे ठरविण्यांत येत आहेत. त्या मला मान्य आहेत.

सकाळचा चहा — सकाळी ६.०० पासून सुरु

सकाळचा नाश्ता — सकाळी ७.०० ते सकाळी ८.३०

सकाळचे जेवण — सकाळी १०.०० ते दुपारी २.००

सायंकाळचा चहा — दु. ४.०० ते ५.००

रात्रीचे जेवण — ७.३० ते रात्री ९.३०

१०. वसतीगृहातील मुलींना मी दोन वेळचे पुरेसे शाकाहारी जेवण देईन व चहा नाष्टयासह त्यापोटी दरमहा रु. २३००/— मात्र प्रती विद्यार्थीनी दर आकारेन.

११. जेवणाचा आठवडयाचा मेनू होस्टेल समिती ठरवून देईल त्याप्रमाणे त्याची मी अंमलबजावणी करेन

१२. कोणत्याही विद्यार्थीनीबददल तक्रार निर्माण झाल्यास त्याबददल संबंधित विद्यार्थीनीस काहीही न बोलता माझी लेखी तक्रार होस्टेल कमिटीकडे मी देईन. त्यांनी सदरची तक्रार होस्टेल समितीच्या सभेमध्ये मांडून त्याचे जे निराकरण होईल, ते मला मान्य राहील.

१३. जेवणासाठी चांगल्या प्रतीचे धान्य,तेल व भाजीपाला यांचा वापर करीन. मेस करिता लागणारे धान्य, तांदुळ, खाद्यतेल इ. रेशनिंगचे मुळीच वापरणार नाही. ते धान्य निवडून स्वच्छ करुन वापरेन व चपातीसाठी चांगल्याप्रतीचा गहू वापरेन. जेवणची गुणवत्ता ही कायम स्वरुपी चांगली ठेवीन व गुणवत्तेमध्ये घसरण झाल्यास सदरहू करार रद्द केला जाईल व त्याचे सर्व अधिकार होस्टेल समितीस असतील याची मला जाणीव आहे.

१४. रोजच्या जेवणामधून राहिलेले तसेच खराब झालेले अन्न पुन्हा वापरले जाणार नाही. आपण सूचित कराल त्याठिकाणीच्या खडड्यातच टाकले जाईल. किंवा बायोगॅससाठी दिले जाईल.

१५. वरील मेसमध्ये फक्त शाकाहारी पदार्थ शिजविले जातील व दिले जातील. तेथे अंडयाचा वा इतर मांसाहारी पदार्थांचा वापर बिलकूल केला जाणार नाही.

१६. संस्थेचे होस्टेल कमिटी सदस्य,प्राचार्य किंवा प्रतिनिधी यांना वेळोवेळी आवश्यक बार्बीची तपासणी करण्याचा अधिकार मला मान्य आहे व याकामी मी त्यांना सर्व आवश्यक सहकार्य करेन.

१७. वरील कोणत्याही शर्तीचा भंग केल्यास करार रद्द केला जाईल तसेच डिपॉझीट जप्त केले जाईल हे मला मान्य आहे.

१८. मेसमध्ये माझे कर्मचाऱ्यांसह बिडी, सिगारेट, तंबाखू, मावा, मद्यपान, अल्कोहोल व नशीले पदार्थ वा तत्सम पदार्थ विकले जाणार नाहीत व सेवन करु दिले जाणार नाही.

१९. मला मेस चालविण्याचा केवळ परवाना आहे त्यान्वये जागेवर वा होस्टेलच्या कोणताही भागावर माझा कोणताही हक्क हितसंबंध वा भाडेकरूंचा हक्क नाही.

२०. मेस चालविण्याचा परवाना मला तबदील करण्याचा हक्क नाही. मी स्वत: मेस चालवेन व ती अन्य कोणामार्फत वा कोणासही पोट कराराने देणार नाही. संस्थेद्वारे वेळोवेळी करण्यांत येणारे नियम, अटी, सूचना मला मान्य असतील. संस्था कोणत्याही वेळी हा करार रद्द करू शकते हे मला मान्य आहे. वरील सर्व अटी मला मान्य असून याबाबत माझी कोणतीही तक्रार नाही.

२१. मी चालवित असलेल्या मेस मधील बेसीन स्वच्छता आणि मेसमधून बाहेर जाणारे ड्रेनेजची स्वच्छता ही सर्वस्वीपणे मी माझ्या स्वखर्चाने करेन. या सदर्भात या ठिकाणी मी असे लिहून देत आहे. ड्रेनेजचे सर्व पाईपलाईन मोठया आकाराचे असून त्यात कोणत्याही प्रकारचे अन्न किंवा खरकटे टाकले नाही तर ड्रेनेजलाईन चोकअप होत नाही. तरी सदर ड्रेनेजमध्ये माझ्या मेस मधून अन्न किंवा खरकटे जाणार नाही यांची मी काळजी घेईन आणि जरी ड्रेनेजपाईप चोकअप झाल्याच तर त्या आम्ही स्वखर्चाने स्वच्छ करून घेईन. अशी हमी देतो.

बारामती

दिनांक : –०२/१२/२०२१

करारनामा लिहून घेणार
श्री.मिलिंद राजकुमार शाह,
सचिव, अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती

करारनामा लिहून देणार
श्री. योगेश भारत सावंत
बारामती

साक्षीदार

१. Mahamuni (V.D. Mahamuni)

२. V.B. Oarli

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2020 ◐ YT 650937

बारामती दि.नं. 23/08/2021

नांव-

पत्ता-

हस्ते-

30799/2021

स्टॅम्प व्हेंडर, बारामती

उप कोषागार कार्यालय बारामती

20 OCT 2021

उपकोषागार अधिकारी बारामती

## क रा र ना मा

विद्यार्थिनी वसतीगृह मेस चालविण्याचा परवानगीचा करार

मा.श्री.मिलिंद राजकुमार शाह,
सचिव, अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, करार लिहून घेणार
बारामती, जि.पुणे

श्री. भंवरलाल कन्हैयालाल गौड
मु.पो. बारामती ता.बारामती,जि.पुणे करार लिहून देणार

कारणे करारनामा लिहून देतो की, बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या आवारातील अनेकान्त एज्युकेशन संस्थेच्या वसतीगृहातील मेस विद्यार्थीनींच्या सोयीसाठी चालविण्याकरिता मी मागणी केल्यावरुन खालील अटींवर आपण मला ती देत आहात. त्याच्या अटी पुढीलप्रमाणे आहेत व त्या मला मान्य आहेत.

१. सदर मेस दि.२४/११/२०२१ ते ३१/०५/२०२२ अखेर (म्हणजेच ६ महिने ७ दिवस चालविण्यांस दिलेली आहे.

२. सदर मुदतीकरिता जागा भाडे दरमहा रु. १५०००/—(रुपये पंधरा हजार फक्त) प्रमाणे पहिल्या ६ महिन्यांचे भाडे एकूण रु. ९००००/— (रूपये नव्वद हजार फक्त) माझा व्यवसाय सुरु करण्यापूर्वी भरण्याचे मला मान्य आहे. तसेच प्रत्यक्ष येणारे लाईट बीलाच्या रक्कमेचा संस्थेकडे दरमहा. विजमंडळाने दिलेल्या मुदत्तीत भरणा करेन. तसेच पाणी पुरवठया बद्दल दरमहा रूपये १००प्रमाणे संस्थेकडे जमा करेन.

३. मेस चालू करण्यापूर्वी मी व्यवसाय नोंदणी, नगरपालिका व प्रांत ऑफिसकडून नियमाप्रमाणे रितसर परवानगी घेण्याची जबाबदारी माझी राहील व ती मी पार पाडीन.

४. स्वयंपाकास लागणारी सर्व प्रकारची भांडी व उपकरणे मी स्वत:ची वापरेन.

५. मेस चालवितांना विद्यार्थीनीकडून मेस शुल्क वसुल करण्याची, आर्थिक देणे घेणे संबंधीत सर्वजबाबदारी माझी/माझेवरच राहील.

६. मेसमध्ये व इतरत्र माझ्यासाठी काम करणारे सर्व कर्मचारी निरोगी व निर्व्यसनी असतील.मी कोणताही बाल कामगार कामावर ठेवणार नाही. तसेच मेसमधील कामगारांना आकाशी निळया रंगाचा ॲप्रन व पायामध्ये एकाच रंगाच्या सपाता स्लीपर्स मी स्वखर्चाने देईन. त्याचप्रमाणे मेसमधील कामगारांची नांवे, पत्ते, फोटो इ. माहिती मी आपल्या कार्यालयात जमा करीन. तसेच वसतिगृह समितीने ठरविल्याप्रमाणे मी मा तसेच वसतिगृह समितीने ठरविल्याप्रमाणे मी माझ्या मेस मधील सर्व कर्मचाऱ्याना माझ्या केटरिंगचे नांव असलेला सर्वासाठी एक पोशाख देईल त्याबदल मला कोणतीही अडचण नाही.

७. मेसरुम, स्वयंपाकघर व माझ्या वापरातील आजूबाजूचा परिसर हा सतत स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी मी घेईन. व ते काम माझ्या कामगारांकडून प्रतिदिनी करुन घेईन.

८. मेसमधील कामगारांचे आवश्यक ते मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट दर तीन महिन्याला घेईन व ते रितसर आपणांकडे सादर करेन.

९. विद्यार्थीनींच्या चहा, नाश्ता व जेवणाच्या वेळा खालीलप्रमाणे ठरविण्यांत येत आहेत. त्या मला मान्य आहेत.

सकाळचा चहा– सकाळी ६.०० पासून सुरु

सकाळचा नाश्ता – सकाळी ७.०० ते सकाळी ८.३०

सकाळचे जेवण – सकाळी १०.०० ते दुपारी २.००

सायंकाळचा चहा – दु. ४.०० ते ५.००

रात्रीचे जेवण – ७.३० ते रात्री ९.३०

१०. वसतीगृहातील मुलींना मी दोन वेळचे पुरेसे शाकाहारी जेवण देईन व चहा नाष्टयासह त्यापोटी दरमहा रु. २३००/– मात्र प्रती विद्यार्थीनी दर आकारेन.

११. जेवणाचा आठवडयाचा मेनू होस्टेल समिती ठरवून देईल त्याप्रमाणे त्याची मी अंमलबजावणी करेन

१२. कोणत्याही विद्यार्थीनीबदद्ल तक्रार निर्माण झाल्यास त्याबदद्ल संबंधित विद्यार्थीनीस काहीही न बोलता माझी लेखी तक्रार होस्टेल कमिटीकडे मी देईन. त्यांनी सदरची तक्रार होस्टेल समितीच्या सभेमध्ये मांडून त्याचे जे निराकरण होईल, ते मला मान्य राहील.

१३. जेवणासाठी चांगल्या प्रतीचे धान्य,तेल व भाजीपाला यांचा वापर करीन. मेसकरिता लागणारे धान्य, तांदुळ, खाद्यतेल इ. रेशनिंगचे मुळीच वापरणार नाही. ते धान्य निवडून स्वच्छ करुन वापरेन व चपातीसाठी चांगल्याप्रतीचा गहू वापरेन. जेवणची गुणवत्ता ही कायम स्वरुपी चांगली ठेवीन व गुणवत्तेमध्ये घसरण झाल्यास सदरहू करार रद्द केला जाईल व त्याचे सर्व अधिकार होस्टेल समितीस असतील याची मला जाणीव आहे.

१४. रोजच्या जेवणामधून राहिलेले तसेच खराब झालेले अन्न पुन्हा वापरले जाणार नाही. आपण सूचित कराल त्याठिकाणीच्या खडड्यातच टाकले जाईल. किंवा बायोगॅससाठी दिले जाईल.

१५. वरील मेसमध्ये फक्त शाकाहारी पदार्थ शिजविले जातील व दिले जातील. तेथे अंडयाचा वा इतर मांसाहारी पदार्थांचा वापर बिलकूल केला जाणार नाही.

१६. संस्थेचे होस्टेल कमिटी सदस्य,प्राचार्य किंवा प्रतिनिधी यांना वेळोवेळी आवश्यक बाबींची तपासणी करण्याचा अधिकार मला मान्य आहे व याकामी मी त्यांना सर्व आवश्यक सहकार्य करेन.

१७. वरील कोणत्याही शर्तीचा भंग केल्यास करार रद्द केला जाईल तसेच डिपॉझीट जप्त केले जाईल हे मला मान्य आहे.

१८. मेसमध्ये माझे कर्मचाऱ्यांसह बिडी, सिगारेट, तंबाखू, मावा, मद्यपान, अल्कोहोल व नशीले पदार्थ वा तत्सम पदार्थ विकले जाणार नाहीत व सेवन करु दिले जाणार नाही.

१९. मला मेस चालविण्याचा केवळ परवाना आहे त्यान्वये जागेवर वा होस्टेलच्या कोणताही भागावर माझा कोणताही हक्क हितसंबंध वा भाडेकरूंचा हक्क नाही.

२०. मेस चालविण्याचा परवाना मला तबदील करण्याचा हक्क नाही. मी स्वत: मेस चालवेन व ती अन्य कोणामार्फत वा कोणासही पोट कराराने देणार नाही. संस्थेद्वारे वेळोवेळी करण्यांत येणारे नियम, अटी, सूचना मला मान्य असतील. संस्था कोणत्याही वेळी हा करार रद्द करू शकते हे मला मान्य आहे. वरील सर्व अटी मला मान्य असून याबाबत माझी कोणतीही तक्रार नाही.

२१. मी चालवित असलेल्या मेस मधील बेसीन स्वच्छता आणि मसेमधून बाहेर जाणारे ड्रेनेजची स्वच्छता ही सर्वस्वीपणे मी माझ्या स्वखर्चाने करेन. या सदर्भात या ठिकाणी मी असे लिहून देत आहे. ड्रेनेजचे सर्व पाईपलाईन मोठया आकाराचे असून त्यात कोणत्याही प्रकारचे अन्न किंवा खरकटे टाकले नाही तर ड्रेनेजलाईन चोकअप होत नाही. तरी सदर ड्रेनेजमध्ये माझ्या मेस मधून अन्न किंवा खरकटे जाणार नाही यांची मी काळजी घेईन आणि जरी ड्रेनेजपाईप चोकअप झाल्याच तर त्या आम्ही स्वखर्चाने स्वच्छ करून घेईन. अशी हमी देतो.

बारामती

दिनांक : ०१/१२/२०२१

करारनामा लिहून घेणार
श्री.मिलिंद राजकुमार शाह,
सचिव अनेकान्त एज्युकेशन सोसायटी, बारामती

करारनामा लिहून देणार
श्री. भंवरलाल कन्हैयालाल गौड
बारामती



साक्षीदार

१. ____________ (V.D. Mahamuni)

२. ____________